# कसई – दोडामार्ग नगरपंचायत

## - ई निविदा नमुना -

कामाचे नाव - कसई- दोडामार्ग नगरपंचायत घनकचरा व्यवस्थापनाच्या दैनंदिन कामासाठी मनुष्यबळ सेवा पुरवठा करणे.

नगरपंचायत कसई-दोडामार्ग
स्थापना
११/०३/२०१५
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग

**कसई-दोडामार्ग नगरपंचायत**
**ता – दोडामार्ग, जि – सिंधुदुर्ग**
**जाहीर ई-निविदा सूचना**

कसई दोडामार्ग नगरपंचायतीला सन २०२६-२०२७ साठी खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे कामे करून घ्यावयाची आहेत. या करिता सेवा पुरविणारे नोंदणीकृत मक्तेदार, सेवा पुरवठा, नोंदणीकृत संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्मची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | कसई-दोडामार्ग नगरपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापनाकरीता मनुष्यबळ सेवा पुरविणे | रु.१४,५३,२८७/- | रु.२९,०६६/- | १०००/- |

ई-निविदा प्रक्रियेच्या दिनांक व वेळेचा तपशील

| अ.क्र | प्रक्रियेचा तपशील | पासून | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| १) | निविदा प्रसिद्धी | १६/०५/२०२६ | ११.०० | २४/०५/२०२६ | ०५.०० वा |
| २) | निविदा नमुना डाऊनलोड करणेचा कालावधी | १६/०५/२०२६ | ११.०० | २४/०५/२०२६ | ०५.०० वा |
| ३) | निविदा,डाऊनलोड केलेल्या नमुन्यात भरून स्वाक्षरीत करून ऑनलाईन अपलोड करून भरणेचा अंतिम दिनांक | | | २४/०५/२०२६ | ०५.०० वा |
| ४) | ऑनलाईन तांत्रिक व वित्तीय बोलीचा लिफाफा उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास) | २५/०५/२०२६ | ०५.०० वा | | |
| ५) | ऑनलाईन निविदा उघडण्याचे स्थळ | मा.मुख्याधिकारी कसई-दोडामार्गनगरपंचायत यांचे दालनात उपस्थित कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समक्ष ( उपस्थित असल्यास ) | | | |

1. वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
2. सर्व पात्र इच्छूक कंत्राटदार यांनी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. त्यासाठी डिजीटळ सिग्नेचर सर्टीफिकेट (DSC) यूसर आय.डी. व पासवर्ड करून घेणे आवश्यक आहे.
3. वरील कामाची निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करण्यात येत असून या निविदेसंबंधी सविस्तर निविदा सूचना व या पुढील सर्व-सूचना /शुधीपत्रक www.mahatenders.gov.in या वेबसाईटच्या माधमातून ऑनलाईन करण्यात येईल.

नगरपंचायत कसई-दोडामार्ग ★ स्थापना ११/०३/२०१५ ★ ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग

मुख्याधिकारी
नगरपंचायत कसई-दोडामार्ग

# कामाच्या अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | निविदा भरणाऱ्या असामी/नोंदणीकृत संस्था यांचे मार्फत नगरपंचायत पुरविण्यात येणाऱ्या कामगारांचे शैक्षणिक पात्रता,वयाचा पुरावा याबाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>तसेच सेवा देणाऱ्या कामगाराचे वय ६० वर्षाच्या आतील असावे तसेच बालकामगार नसावा. |
| २ | निविदेचा कालावधी कामाचे आदेश दिल्यापासून २ महिन्याचे किंवा नगरपंचायत ठरवील त्या प्रमाणे राहील. |
| ३ | निविदेतील सर्व वा कोणत्याही अटी व शर्ती पूर्तता न करणाऱ्या कंत्राटदाराच्या निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा ग्राह्य समजल्या जाणार नाहीत. |
| ४ | आलेल्या निविदेपैकी कोणत्याही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मुख्याधिकारी कसई-दोडामार्ग नगरपंचायत यांनी राखून ठेवलेला आहे. |
| ५ | या कामाच्या कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत रु.१०००/- एवढ्या रकमेची original online/NEFT chalan/Receipt स्कॅनप्रत अपलोड (upload) करावी लागेल. |
| ६ | या कामाची बयाणा रक्कम रु२९०६६/- एवढ्या रकमेची original online/NEFT chalan/Receipt स्कॅनप्रत अपलोड (upload) करावी लागेल. |
| ७ | निविदा (Technical Cover Financial Cover) वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर अपलोड (upload) करावयाची आहे.लिफाफा '1' (Technical Cover) मध्ये तांत्रिक बोली व लिफाफा '2' (Financial Cover) मध्ये वित्तीय बोली दयावायची आहे. |
| ८ | लिफाफा '1' (Technical Cover) मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे.(सदरची कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड (upload) करावयाची आहे. |
| | १) बयाणा रक्कमेच्या पावतीची छायाप्रत |
| | २) पॅनकार्डची अभिप्रमानीत केलेली छायाप्रत |
| | ३) कर्मचारी भविष्यनिधी नियम १९५२ नुसार नोंदणी प्रमानपत्राची खरी नक्कल व मागील ३ महिने सर्व कार्मचारांचा EPF भरल्याचे चलन |
| | ४) यापूर्वी नगरपंचायतीचे/नगरपरिषदेचे किमान वेतन नियमानुसार काम केल्याचा अनुभव असणे व तत्संबंधी कागदपत्रे जोडणे आवश्यक |
| | ५) आयकर मागील ३ वर्षाचा स्वाक्षरीने साक्षांकित करून अपलोड करावा |
| | ६) Employee's State Insurance Corporation (ESIC) नोदणी संबधी कागदपत्र |
| | ७) कामगारांचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक अथवा कामगार अधिकारी यांचे पत्र आवश्यक |
| | ८) दर कामाचे संबंधित नगरपरिषदेच्या कोणत्याही नगराध्यक्ष / नगरसेवक यांचा हिस्सा किंवा भागीदारी नसल्याबाबतचा प्रतिज्ञापत्र |
| | ९) कोणत्याही शासकीय/निम शासकीय संस्थेमध्ये काळ्या यादी टाकले नसल्याचे स्वयंसाक्षांकित प्रतिज्ञापत्र |
| | १०) निविदेत सादर केले कागदपत्रे हि खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र व प्रत्येक कागद स्वाक्षरीने साक्षांकित केलेला असला पाहिजे |
| ९ | **लिफाफा "२' ( Financial Cover) मध्ये निविदादाराने मनुष्यबळ सेवा पुरविणे साठी स्वतंत्रपणे उक्ता (lump sum ) दर BOQ मध्ये योग्य त्या जागी भरून सदरचे प्रपत्र BOQ वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलोड कारवायचा आहे. टक्केवारी दर (Financial Cover) स्वीकारले जाणर नाहीत**<br><br>**तसेच निविदा हि अंदाजपत्रकामध्ये एका कर्मचार्यामागे आकारण्यात आलेल्या (१०%) आस्थापना खर्चाच्या प्रमाणात भरावयाची आहे. उदा. कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास ती कंत्राटदारास देण्यात येणाऱ्या आस्थापना खर्चातून कमी करण्यात येईल कर्मचाऱ्यांच्या वेतनावर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही याची नोंद घ्यावी.** |
| १० | प्रत्यक्ष "२" अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोणत्याही ठिकाणी नमूद करू नयेत . |
| ११ | ज्याची निविदा मंजूर होईल त्यांनी निविदा प्रपत्र व इतर सर्व मूळ कागदपत्रे साक्षांकीत करून दायावयाची आहेत. |
| १२ | निविदेमध्ये निविदाराला निविदेच्या मजकुरामध्ये कोणताही बद्दल करता येणार नाही अ स्वत : च्या अटी, शर्ती घालता येणार नाही, असे आढळून आल्यास निविदा ग्रहाय धरली जाणार नाही . |
| १३ | निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्राबाबत संदिग्धता वाटूलयास सदरच्या कागदपत्राची मागणी केल्यावर त्याची मूळ प्रत कार्यालयाकडे तातडीने सादर करणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| १४ | या कमी आवश्यक असलेली इतर सर्व माहीत नगरपंचायत कार्यालयामधून घेऊनच सर्व शासकीय निविदेतील दर दयावयाचे आहे . |
| १५ | निविदेमध्ये किमान वेतनाचे दर विचारात घेऊन तसेच विविध शासकीय दर व कर विचारात घेऊन प्रत्यकी एका कामगाराची सेवा पुरवल्यास त्यास देवा लागणारा पूर्ण वेळेचा दर वित्तीय बोलीचा अ.क्र.१ मध्ये नमूद करावा. |
| १६ | सदरची सेवा पुरविले मुळे पुरविण्यात येणाऱ्या कामगारांना नगरपंचायत अस्थपनेवरील कोणताही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत तसेच याबाबत कोणत्याही कार्यलयात तक्रार दाखल करता येणार नाही. |
| १७ | प्रत्येक कामगारीची नोंदवही ठेऊन त्यामध्ये केलेल्या कामाचा तपशील ठेवणे आवश्यक आहे. तसेच हजेरी पट ठेवायचा असून कार्यालय अधीक्षक यांचेकडून तपासून घ्यावयचा आहे |
| १८ | घनकचरा हाताळणी व्यवस्थापन अधिनियम २०२६ चे पालन करावे लागेल. |
| १९ | पुरविण्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन कायदा १९४८, कर्मचारी भविष्य निधी तसेच इतर लागू लेबर लॉ याबातच्या इतर कायदेनुसार वेतन सुविधा देण्याची जबाबदारी निविदादार याची राहील. |
| २० | निविदादार यांनी बिल सादर करतेवेळी नगरपंचायतीच्या नियत्रण अधिकाऱ्याचा काम व्यवस्थित आढल्यास नियमानुसार बिलातून वजावट करण्यात येईल. |
| २१ | नगरपंचायतिने नेमुन दिलेल्या कामे करण्यास टाळाटाळ केल्यास अगर दिरंगाई केल्यास मंजूर केलेली निविदा रद्द करण्याचा अधिकार नगरपंचायतीस राहतील. |
| २२ | निविदा मंजूर झाल्यावर इकडील पसंतीनुसार योग्य त्या किमतीच्या स्टॅम्प पेपर वर करारपत्र करून देणे निविदादार यांचेवर बंधनकारक राहील. |
| २३ | शासकीय नियमानुसार प्राप्तिकर वैगरेच्या शासनास देय होणाऱ्या रकमा मक्तेदाराचे बिलातून कपात करून घेण्यात येतील. |
| २४ | निविदा भरणाऱ्या असामी/नोंदणीकृत संस्था यांना शासकीय,निमशासकीय सामाजिक संस्था व इतर संस्था यांना अश्या प्रकारची सेवा पुरविल्याबद्दल अनुभव असल्यास त्याबाबतचे कागदपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २५ | कामावर असताना कामगारांना कोणत्याही दुखापत,इजा अथवा अपघात झालायस त्याचे दायित्व कंत्राटदाराचे राहील नगरपंचायत त्यास जबाबदार असणार नाही |
| २६ | कसई-दोडामार्ग नगरपंचायतीस विविध विभागातील कार्यालयीन कामाचे सेवा पुरविणे प्रतिमाह पुरविणे बंधनकारक राहील. |
| | कोणत्याही धार्मिक सणाच्या दिवशी दक्ष राहून कसई-दोडामार्ग नगरपंचायतीस विविध विभागातील सेवा पुरविणे प्रतिमाह पुरविणे आवश्यक आहे. कोणत्याही परीस्थितीत मक्तेदाराला काम बंद ठेवता येणार नाही. अपरिहार्य कारणास्तव मक्तेदारकडील कामगार गैरहजर राहिल्यास कंसई-दोडामार्ग नगरपंचायतीतील विविध विभागातील कार्यालयीन कामाचे सेवा पुरविणे याची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. |
| २८ | आकस्मित परीस्थित किंवा नैसर्गिक अप्पातीच्या वेळी जादा कामगारांची आवश्यक असल्यास ते वित्तीय बोलीत नमूद दारामध्ये पुरविणे मक्तेदारास बंधनकारक राहील |
| २९. | कोणत्याही परस्थिती मक्तेदारास या निविदेतील बाबीसाठी मंजूर दराव्यतिरिक्त वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही. |
| ३०. | सर्व पुरवठा करण्यात आलेल्या मजूर –कर्मचारी यांना गणवेश व ओळखपत्र देणे आवश्यक आहे.त्यांना सर्व सुरक्षा साधने (अंदाजपत्रकात नमूद) पुरवावे लागतीत. हि संपूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील व त्याबाबत योग्य व परिपूर्ण अहवाल सादर केल्या नंतरच अंदाजपत्रकात नमूद दराने देयक अदा करण्यात येईल कोणत्याही तक्रार प्राप्त झाल्यास नगरपंचायत जबाबदार राहणार नाही. |
| ३१ | मक्तेदारी निविदा भरताना संपूर्ण शहराची पाहणी करून स्वत:चे स्थळपाहणी करून नगरपंचायत हद्दीतील सादर कामकाजाचा कृती आराखडा हा संबंधित अधिकारी यांजकडून प्रमाणित करून सादर करणे बंधनकारक राहील तसेच Geo Tagging फोटो निविदा फॉर्म सोबत जमा करावेत. |
| ३२ | कंत्राटदाराने कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक आठवड्याच्या शेवटी कर्मचार्यांनी केलेल्या कामाचा अहवाल स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे स्वतः कार्यालयात उपस्थित राहून सादर करावयाचा आहे, प्रतिनिधी मार्फत अहवाल सादर केल्यास मान्य केला जाणार नाही. तसेच अहवाल देण्यास दिरंगाई झाल्यास प्रतिदिन रु.१०००/- दंड आकारण्यात येईल. |
| ३३ | कंत्राटदाराने त्यांनी पुरवठा केलेल्या कर्मचार्याच्या खात्यात किमान वेतन कायद्यानुसार वेतन जमा केल्याचे पत्र व त्यासोबत बँक स्टेटमेंट देणे बंधनकारक असेल, तसेच EPF भरणा केल्याचे चलन व दाखला, मासिक हजेरीपत्रक,वेजेस रजिस्टर व इतर आवश्यक कागदपत्रे मासिक देयक सोबत देणे बंधनकारक असेल. |
| ३४ | कंत्राटदारामार्फात पुरविण्यात येण्याऱ्या कुशल कर्मचारी यांच्याकडे ड्रायविंग लायसन्स व android स्मार्टफोन असणे बंधनकारक असेल. तसेच त्यांच्याकडे कंत्राटदाराने ओळखपत्र देणे बंधनकारक असेल. |
| ३५ | कंत्राटदाराने कर्मचार्यांना स्वच्छतेविषयी नगरपंचायतीकडून देण्यात येणाऱ्या सूचना देण्यात याव्यात. |

नगरपंचायत कसई-दोडामार्ग स्थापना २३/०३/२०१५ जि. सिंधुदुर्ग

| | |
|---|---|
| ३६ | नगरपंचायतीच्या अग्निशमन विभागास २४ तास कर्मचारी सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल. |
| ३७ | पावसाळयापूर्वी सर्व गटारे नाले साफसफाई करून देणे बंधनकारक असेल, सर्व गाड्यांचे लॉग बुक अद्ययावत ठेवन्याबाबत कंत्राटदाराने संबंधित कर्मचाऱ्यास सूचना द्याव्या. |
| ३८ | कंत्राटदार व कर्मचारी यांच्यात वाद झाल्यास त्यास नप जबाबद्वार असणार नाही, तसेच कर्मचार्यांचे काम असमानाधानकारक वा गैरहजार असल्यास तत्काळ दुसरा कर्मचारी उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल, कर्मचारी उपलब्धते अभावी कामात खंड पडल्यास दंड देयकातून वसूल करण्यात येईल. |
| ३९ | अंदाजपत्रकानुसार घंटागाडी दुरुस्ती करणे व गाडीचा देखभाल ठेवण्याची जबाबदारी पूर्णपणे कंत्राटदाराची राहील. |
| ४० | कर्मचाऱ्यानी घरोघरी जाऊन कचरा संकलित करणे, ओला व सुका कचरा वेगळा स्वीकारणे व प्रत्येक घरी काचा घेतल्यावर आपल्या सूचना केलेल्या ICT प्रणालीद्वारे Scanning करणे बंधनकारक आहे. |
| ४१ | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे कचरा वेगवेगळ्या प्रकारात विलगीकरण करणे व त्यापासून खतनिर्मिती करण्याबाबत व या सर्व कामाचे लॉग बुक अद्ययावत ठेवेणेबाबत कर्मचाऱ्याना सूचित करण्यात यावे. |
| ४२ | FSTP प्लांट ची देखभाल करणे व तो कार्यन्वित ठेवेणेसाठी कर्मचारी नेमणे आवश्यक असेल. |
| ४३ | शहरातील उद्यान साफसफाई करिता आवश्यकतेनुसार कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावे. |
| ४४ | पूर, भूकंप, साठीचे रोग या सारख्या आपत्ती जनक परिस्थतीत सर्व कर्मचारी उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यात यावी, अन्यथा आपल्या देयकातून दंड वसूल करण्यात येईल. |
| ४५ | कचरा हाताळणाऱ्या कर्मचारी यांची प्रत्येक ६ महिन्यात आरोग्य तपासणी करण्यात यावी. |
| ४६ | नागरीकंच्या तक्रारी आणि त्यांच्या निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यन्वित ठेवावी. |

मुख्याधिकारी
नगरपंचायत कसई-दोडामार्ग

नगरपंचायत कसई-दोडामार्ग
स्थापना १९/०३/२०१५
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग

Signature Not Verified
Digitally signed by ABHISHEK AMRUT NEMANE
Date: 2026.05.15 18:46:29 IST
Location: Maharashtra-MH